सक्तीचा प्रती‍क्षाधिन कालावधी मजूर करणेबाबत.
श्री. अनिल लहू माळवे, लेखा अधिकारी.

महाराष्ट्र ...
18 AUG 2026
प्राप्त झाले सही...........

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन आदेश:-संलेको-2025/प्र.क्र. 26/1743408/कोषा प्रशा-2
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- 400 032.
दिनांक :- 17 ऑगस्ट, 2026.

संदर्भ:-
1) सहसंचालक (प्रशासन),लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र संलेवको/प्रशा-राप/का.6/श्री. माळवे/05.26/625/535/2397, दि.12.05.2026
2) सहसंचालक (प्रशासन),लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेको/प्रशा-राप/का-6/श्री. माळवे/10.24/1302/999, दि.21.10.2024,
3) शासन वित्त विभाग क्र.संलेको-2022/प्र.क्र.133/कोषा प्रशा-2, दि.28.02.2023,
4) गट विकास अधिकारी, पंचायत समिती राधानगरी यांचे जा.क्र.परारा/वशि /514/2023, दि.06.04.2023,
5) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड, पुणे यांचे जा.क्र.1844 /आस्था / उपप्रापका/ पिंचिं/2023,दि.21.04.2023,
6) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-3/मविलेसे (राप)/ प्रतिक्षाधीन/04/2023/759,दि.24.04.2023
7) परिवहन उप आयुक्त (प्रशासन),मुंबई यांचे पआका/का.8/आकृतीबंध भाग-2/लेखाधिकारी/2020/जा.क्र.7537,दि.27.06.2023,
8) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-2/मविलेसे लेअ राप संवर्ग / कार्यमुक्त / श्री. माळवे / 06 / 2023 /1163, दि.30.06.2023,
9) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-2/मविलेसे लेअराप संवर्ग/ कार्यमुक्त / श्री. माळवे / 06 / 2023 / 1163, दि.30.06.2023,
10) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड, पुणे यांचे जा.क्र.3964/आस्था/प्रापका/ पिंचिं/2023,दि.03.07.2023,
11) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-3/रजा/ श्री.माळवे/12-2023/2611,दि.20.12.2023,

## -: शासन आदेश :-

जिल्हा परिषद जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ सेवेतील श्री. अनिल लहू माळवे, सहायक लेखा अधिकारी, यांची पदोन्नतीने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी संवर्गात लेखाधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड, पुणे या पदावर संदर्भ क्र.3, दि.२८.०२.२०२३ च्या आदेशान्वये पदस्थापना करण्यात आली.

2. श्री. माळवे, लेखा अधिकारी यांना पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्यासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती राधानगरी, ता. राधानगरी, जि.कोल्हापूर यांचे संदर्भ क.4 अन्वये दि.२१.०४.२०२३ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले. तथापि, उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात लेखाधिकारी पद मंजूर नसल्याने श्री. माळवे यांना पदोन्नतीने देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या पदावर संदर्भ क्र.5 अन्वये रुजू करुन घेण्यात आले नाही.

12|

3. शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ अन्वये श्री. माळवे हे पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असल्याने सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे येथे संदर्भ क्र.6 अन्वये दि.24.04.२०२३ (म.पु.) रोजी हजर झाले असून श्री. माळवे यांचेकडे तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे येथील कामकाज सोपविण्यात आले.

4. परिवहन उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांना संदर्भ क्र.7 दि.२७.०६.२०२३ अन्वये श्री. माळवे, लेखाधिकारी यांना रुजू करुन घेण्याबाबत देण्यात आलेल्या सुचनेनुसार श्री.माळवे यांना सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे येथून संदर्भ क्र.8 अन्वये दि.30.06.2023 (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले. तसेच संदर्भ क्र.9 अन्वये श्री.माळवे यांना प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवळ, पुणे या पदस्थापनेच्या पदावर दि. 03.07.2023 (म.पू) रोजी रुजू करुन घेण्यात आले.

01657/2026/2200
19-08-26

5. श्री. माळवे यानी पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असताना दि.२१.०४.२०२३ ते दि.02.07.२०२३ या कालावधीत एकुण 07 दिवस अर्जित रजा उपभोगलेली असून सदर रजा संदर्भ क्र.11 दि.२०.१२.२०२३ अन्वये मंजूर केलेली आहे.

6. श्री.माळवे, लेखाधिकारी यांचा नियमित करावयाचा प्रतिक्षाधीन कालावधी पुढीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | कालावधी | रजेचे दिवस | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | दि.21.04.2023 | 01 दिवस | रुजू करुन घेण्यात आले नाही. |
| 2. | दि.22.04.2023 ते दि.23.04.2023 | 02 दिवस | साप्ताहिक सुट्टी (शनिवार व रविवार) |
| 3. | दि.24.04.2023 ते दि.30.06.2023 | 68 दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे या कार्यालयात हजर |
| 4. | दि.01.07.2023 ते दि.02.07.2023 | 02 दिवस | साप्ताहिक सुट्टी (शनिवार व रविवार) |
| | एकुण = | 73 दिवस | |

7. शासन अधिसुचना, वित्त विभाग दि.03.03.2016 अन्वये सुधारित म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम 2016 अन्वये सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी नियमित करण्याचे पूर्ण अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे सचिव यांना प्रत्यायोजित करण्यात आलेले आहेत. सबब, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) 1981 च्या नियम 9 (14) (फ) च्या तरतूदीनुसार, श्री. अनिल लहू माळवे, लेखा अधिकारी यांना दि.21.04.2023 ते दि.02.07.2023 पर्यंत 73 दिवस पदस्थापनेशिवाय राहावे लागले असल्याने सदर कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

8. सदर कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता लेखा अधिकारी, समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by
Tanaji Raghunath Pawar
Date: 17-08-2026
14:55:57

(ता.र.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

1) महालेखापाल 1/2, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
2) सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,
3) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
4) लेखा अधिकारी, समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, कोल्हापूर,*
5) सहसंचालक, लेखा व कोषागार, पुणे विभाग, पुणे,*
6) श्री.अनिल लहू माळवे, लेखा अधिकारी*
7) निवड नस्ती, कोषा प्रशा -2,

* (संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)